शब्दांना सत्याची धार
प्रहार

रत्नागिरी

मराठे महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली फटाकेमुक्त दिवाळीची प्रतिज्ञा

राजापूर (वार्ताहर): येथील आबासाहेब मराठे महाविद्यालयात पर्यावरणपूरक आणि आरोग्यास घातक नसलेली फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा देऊन विशेष प्रोत्साहन देण्यात आले.

महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग आणि संशोधन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या काळात फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्यांना जागरूक करणे व यातून पर्यावरणाचा शाश्वत विकास साधणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमादरम्यान रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमंत अकोलकर यांनी विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. राजाराम राठोड, डॉ. कुलभूषण ससाणे, डॉ.संजय मेस्त्री आणि डॉ.अतुल भावे उपस्थित होते.

RAVE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

मराठे महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली फटाकेमुक्त दिवाळीची प्रतिज्ञा

राजापूर (वार्ताहर): येथील आबासाहेब मराठे महाविद्यालयात पर्यावरणपूरक आणि आरोग्यास घातक नसलेली फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा देऊन विशेष प्रोत्साहन देण्यात आले.

महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग आणि संशोधन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या काळात फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्यांना जागरूक करणे व यातून पर्यावरणाचा शाश्वत विकास साधणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमादरम्यान रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमंत अकोलकर यांनी विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. राजाराम राठोड, डॉ. कुलभूषण ससाणे, डॉ.संजय मेस्त्री आणि डॉ.अतुल भावे उपस्थित होते.

Ratnagiri Edition
Oct, 30 2026 Page No, 8
https://epaper.prahaar.in